# क्रीडा स्पर्धांतून अग्निशमन जवानांना बळ मिळेल - आ. फडणवीस

नागपूर / प्रतिनिधी

अग्निशमन विभाग खऱ्या अर्थाने विविध आपत्तींचा सामना करीत असतो. आगीसोबतच बुडणाऱ्यालाही वाचवणे, साधा साप निघाला तरी या विभागाच्या जवानांना बोलावणे येते. अशी जोखमीची कामे करताना या विभागाचे जवान पोलिसांप्रमाणेच आपले प्राण धोक्यात घालत असतो. कर्तव्यासाठी तो सदैव तत्पर असतो. क्रीडा स्पर्धांच्या आयोजनातून अग्निशमन विभागाच्या जवानात खिलाडी वृत्ती निर्माण होऊन त्यांना संकटाचा सामना करण्यासाठी बळ मिळेल, असा विश्वास आ. देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

दी महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस पर्सोनल वेल्फेअर असोसिएशन मुंबई व नागपूर महापालिका आणीबाणी सेवा विभाग नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धाचे चिटणीस पार्क येथे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महापौर अर्चना डेहनकर, तर व्यासपीठावर सत्तापक्षनेते प्रवीण दटके, झोन सभापती बंडू राऊत, प्रमुख अग्निशमन अधिकारी चंद्रशेखर जाधव, नाशिकचे मुख्य अग्निशमन अधिकारी महाजन, नवी मुंबईचे विजय राजे, मुंबईचे शेट्टी, लातूरचे सुतार, एसएफटीसीचे किरण हत्याळ, कल्याणचे दिलीप गुंड आदी अग्निशमन अधिकारी होते.

मनपाच्या अग्निशमन विभागाचे जवान कोणत्याही आपत्तीचा सामना करण्यासाठी सदैव तत्पर असतात, असे प्रतिपादन महापौर अर्चना डेहनकर यांनी केले. दोन दिवसांच्या क्रीडा स्पर्धाच्या आयोजनानंतर चर्चासत्र, संगीतरजनी आदी कार्यक्रम डी. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित करण्यात आले होते. क्रीडा स्पर्धाचा निकाल जाहीर करण्यात आला. यात मुंबई अग्निशमन संघ 'अ' कबड्डी विजेता ठरला. उपविजेता कल्याण डोंबिवली, तृतीय मुंबई अग्निशमन संघ 'ब,' चतुर्थ एमआयडीसी 'अ' संघाने पटकावला.

हॉलीबॉल - विजेता संघ मुंबई अग्निशमन 'अ', उपविजेता एम आयडीसी 'अ', तृतीय एमआयडीसी 'ब,' चतुर्थ क्रमांक कल्याण अग्निशमन दल.

रस्सीखेच - मुंबई अग्निशमन दल 'अ', उपविजेता मुंबई अग्निशमन दल 'ब,' तृतीय नवी मुंबई 'ए', चतुर्थ मनपा कल्याण डोंबिवली अग्निशमन दल व गोळाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक मुंबई संघाचा जितेंद्र बळीराम, दुसरा क्रमांक औरंगाबादचा रमेश सोनवणे, तिसरा एमआयडीसीचा आर. डी. चोरडे यांनी पटकावला.

या स्पर्धासाठी मनपाच्या क्रीडा विभागाचे अधिकारी हंबीतराव म ोहिते, अग्निशमन विभागाचे विकास यादव, स्थानाधिक री आर. डी. उचके, सुनील राऊत, साहाय्यक केशव कोठे, आर. आर. दुबे, पी. एन. कावळे, बंड, सतीश रहाटे यांच्यासह अग्निशमन विभागाचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.